रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

♦ वर्ष १७ ♦ अंक ८
www.ramprahar.com

गुरुवार, २५ जुलै २०२४ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹ २

## अंतरंग

पालीतील रिक्षाचालकाची मुलगी झाली सीए/२
आमदार निरंजन डावखरे यांचा पनवेलमध्ये सत्कार/३
राज्य तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर/८

## राज्यात सरासरीपेक्षा ३२ टक्के जास्त पावसाची नोंद



**पुणे :** राज्यात जुलै महिन्यात सर्वदूर दमदार पाऊस झाला. २४ जुलैअखेर सरासरीपेक्षा ३२ टक्के जास्त पावसाची नोंद झाली आहे. जूनअखेर कमी पाऊस झालेल्या किनारपट्टीवरील जिल्ह्यांसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही मुसळधार झाल्यामुळे शेतकरी आता सुखावला आहे. हिंगोली, नंदूरबार आणि अमरावतीत मात्र सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. किनारपट्टीवरील जिल्ह्यांत सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. मुंबई शहरात सरासरीपेक्षा ४१ टक्के जास्त (१५८४.१ मिमी), मुंबई उपनगरात ५२ टक्के जास्त (१८४२.८ मिमी), पालघरमध्ये ३२ टक्के जास्त (१४५७.६ मिमी), रायगडमध्ये ४० टक्के जास्त (२१८०.३ मिमी), रत्नागिरीत ४४ टक्के जास्त (२४७३.९ मिमी), सिंधुदुर्गमध्ये ५२ टक्के जास्त (२५७३.५ मिमी) आणि ठाण्यात २२ टक्के जास्त (१४५८.६) मिमी पाऊस पडला आहे.

# मत्स्योद्योग विकास धोरण समितीची बैठक

### पारंपरिक मच्छीमारांसाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मांडली भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बांधवांना उद्‌भवणाऱ्या समस्यांना डोळ्यासमोर ठेवून या मच्छीमारांवर कोणताही अन्याय होणार नाही, असे धोरण ठरवण्याची मागणी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी मत्स्योद्योग विकास धोरण समितीच्या बैठकीत केली.



पावसाळी अधिवेशनात दिलेल्या आश्वासनानुसार महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास धोरण समितीची बैठक मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत आणि माजी राज्यपाल राम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २३) रात्री मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात झाली. या बैठकीत महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास धोरण ठरवण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी मच्छीमार बांधवांच्या प्रश्नांवर चर्चा करताना आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी आपली भूमिका मांडून रायगड तसेच आसपासच्या परिसरातील पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बांधवांना उद्‌भवणाऱ्या समस्यांना डोळ्यासमोर ठेवून या मच्छीमारांवर कोणताही अन्याय होणार नाही, असे धोरण ठरवण्याची मागणी केली.

या बैठकीला मंत्री दीपक केसरकर, उदय सामंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आमदार सर्वश्री रमेश पाटील, राजन साळवी, भाई जगताप, मनिषा चौधरी, आशिष जयस्वाल, पंकज भोयर, प्रवीण दटके यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाचा मंत्री रवींद्र चव्हाणांकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा आढावा राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी (दि. २४) पनवेलमध्ये घेतला. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील पॅकेज १ ते पॅकेज १०च्या कामाची सद्यस्थिती आणि प्रगतीचा तसेच पावसाळ्यात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. त्याचबरोबर ऐन पावसाळ्यात महामार्गावर कुठलीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, संबंधित अधिकाऱ्यांच्या टीमने पावसाळ्यात २४ X ७ दक्ष रहावे, असे निर्देश देत मुसळधार पावसामुळे या महामार्गावर जे खड्डे पडले असतील ते तातडीने बुजवून वाहनचालकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा स्पष्ट सूचनाही मंत्री चव्हाण यांनी दिल्या.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

**जालना : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे-पाटील यांनी जालन्यातील अंतरवाली सराटीत सुरू केलेले आमरण उपोषण तब्येत ढासळल्याचे कारण देत स्थगित केले आहे. नारायणगडाचे मठाधिपती आणि गावातील महिलांच्या हस्ते ज्यूस पिऊन जरांगे यांनी उपोषण सोडले.



या संदर्भात बोलताना जरांगे म्हणाले, मी उपोषण करायला तयार आहे, मात्र गावकऱ्यांनी उपचार घेण्यासाठी, पाणी पिण्यासाठी किंवा सलाईन लावण्यासाठी आग्रह करायचा नाही. विनाउपचार घेता आणि सलाईन न लावता मी मरेपर्यंत उपोषण करायला तयार आहे, पण सलाईन लावून उपोषण करायला तयार नाही. खोटे आणि बेगडी उपोषण मी करणार नाही. सलाईन लावून पडून राहण्यापेक्षा उपोषण न केलेले बरे.

## पाकिस्तान रिटर्न महिलेवर गुन्हा

**ठाणे** : येथील लोकमान्य नगर परिसरात राहणाऱ्या २३ वर्षीय महिलेने बनावट कागदपत्रांच्या आधारे पारपत्र तयार करून पाकिस्तान गाठल्याचे समोर आले होते. महिलेने पाकिस्तानात जाऊन तेथील एका तरुणासोबत निकाह केला. त्यानंतर ती भारतात परतली आहे. दरम्यान, तिच्याविरोधात बनावट कागदपत्र तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असून तिची चौकशी सुरू आहे.

# अनिल देशमुखांचे रेकॉर्डिंग माझ्याकडे, श्याम मानव सुपारीबाजांच्या नादी!

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आरोपांवर प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी त्यांच्यावरील आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे.

अनिल देशमुख यांना प्रतिज्ञापत्राद्वारे उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अजित पवार यांच्यावर आरोप करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी दबाव टाकला होता, असा आरोप श्याम मानव यांनी केला होता. त्यावर फडणवीस म्हणाले की, अनिल देशमुख यांच्याच पक्षातील लोकांनी त्यांचे ऑडिओ रेकॉर्डिंग माझ्याकडे दिले आहे तसेच श्याम मानव हे मला बऱ्याच वर्षांपासून ओळखतात. माझ्यावर इतके मोठे आरोप करण्यापूर्वी त्यांनी मला विचारायला हवे होते, पण दुर्दैवाने इकोसिस्टिममध्ये अलिकडे सुपारी घेऊन बोलणारे लोक घुसलेले आहेत. दुर्दैवाने श्याम मानव हे त्यांच्या नादी लागले आहेत का? असा प्रश्न मला पडतो.



उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, एक गोष्ट स्पष्टपणे मला सांगायची आहे. अनिल देशमुख यांच्यावर झालेले आरोप आमच्या सरकारच्या काळात नाही, तर मविआ सरकारच्या काळात झाले होते. हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीसाठी आले. मुख्य न्यायाधीशांनी देशमुख यांच्यावर एफआयआर करायला लावला आणि मग देशमुख तुरुंगात गेले. १०० कोटींच्या वसुलीप्रकरणी देशमुख तुरुंगातून जामिनावर बाहेर आलेले आहेत. ते दोषमुक्त झालेले नाहीत.

अनिल देशमुख यांच्याच पक्षातील लोकांनी त्यांचे ऑडिओ रेकॉर्डिंग माझ्याकडे दिले आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि सचिन वाझे यांच्याबद्दल अनिल देशमुख काय बोलतात? आमच्यावर केलेल्या आरोपाबाबत ते काय बोलतात? याचा माझ्याकडे पुरावा आहे. जर माझ्यावर वेळ आली, तर मला ते उघड करावे लागेल. मी कधीच पुराव्याशिवाय बोलत नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला आहे.

## निवडक

### नेपाळमध्ये विमान अपघातात १८ जण ठार; पायलट बचावला



**काठमांडू** : नेपाळच्या काठमांडू विमानतळावर बुधवारी (दि. २४) झालेल्या भीषण विमान अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. या विमानात एकूण १९ प्रवासी होते. त्यापैकी पायलट बचावला असून त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सौर्य एअरलाईन्सचे हे विमान काठमांडूवरून पोखरा येथे जाताना उड्डाण घेतल्यानंतर काही मिनिटांतच अचानक खाली कोसळले. या अपघाताचे व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

## सुधागडात प्रवाशांचा जीव धोक्यात घालून एसटी बसचालकाची स्टंटबाजी

### वाहत्या पाण्यातून गाडी दामटवली; चालक निलंबित

**पाली : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे पुलावरून पाणी जात असतानाही प्रवाशांचा जीव धोक्यात घालून एसटी बस पुढे नेल्याचा प्रकार सुधागड तालुक्यातील भेरव येथे घडला आहे. त्यामुळे पेण आगाराचा हा चालक यू.एम. बनसोडे याला निलंबित करण्यात आले आहे.



पाली एसटी बसस्थानकावरून बुधवारी (दि. २४) सकाळी घोडगावमार्गे पेणकडे जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस निघाली. मुसळधार पावसामुळे भेरव गावाजवळील अंबा नदीपुलावरून पाणी जात होते. अशा धोकादायक परिस्थितीत मागचा पुढचा विचार न करता चालकाने स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालून पुलावरून वाहत्या पाण्यातून बस नेली. त्यामुळे चालकाचे निलंबन करण्यात आले आहे.

# उरण विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांचा होणार विकास

### ४० कोटी रुपयांच्या कामाला मिळाली प्रशासकीय मान्यता | आमदार महेश बालदी यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणीनुसार उरण विधानसभा मतदारसंघातील १३ रस्त्यांच्या विकासकामांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे सुमारे ४० कोटी रुपये खर्च करून या रस्त्यांची दर्जोन्नती होणार आहे.



यामध्ये राममा ०४ नांदगाव ते नांदगाव कातकरवाडी रस्ता, विंधणे प्ररामा ०४ ते बोरी बु., रामा १०३ ते मुळेखंड, भोम ते मोठी जुई, रामा १०३ ते धुतुम, पोयंजे ते मोहपे, राममा ०४ ते घोसाळवाडी, रामा १०४ ते माडभुवन, रामा १०३ बंबावी ते बंबावी कोळीवाडा, रामा १०७ गुळसुंदे ते आकुळवाडी, राममा ४ ते डेरवली, कल्हे ते लहूचीवाडी, कोप्रोली ते कोप्रोली आदिवासीवाडी या रस्तांचा विकास होणार आहे. यासाठी निधी देण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली होती. त्यांची मागणी आणि पाठपुराव्याने ४० कोटी रुपयांच्या या कामांना ग्रामविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून तसा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. लवकरच या कामांची निविदा प्रसिद्ध होऊन रस्त्यांच्या विकासकामाला सुरुवात होईल. या मंजुरीबद्दल आमदार महेश बालदी यांनी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन आणि राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

# लोणावळ्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

### बंगल्यात अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढण्यात यश



**लोणावळा : प्रतिनिधी**

राज्याच्या अनेक भागात जोरदार पाऊस पडत आहे. अशातच पर्यटननगरी लोणावळ्यात ढगफुटीसदृश्य पाऊस झालो. या पावसाने सखल भागात पाणी साचले. याच पाण्यामुळे मळवली भागातील बंगल्यात २० ते २२ पर्यटक अडकले होते. त्यांना शिवदुर्ग रेस्क्यू टीमने सुखरूपपणे बाहेर काढले.

लोणावळ्यात मोसमातील उच्चांकी पाऊस बरसला आहे. या पावसाने सखल भागात पाणी साचले होते, तर रस्त्यांवर पाणीच पाणी झाल्याने रस्त्यांना नदीचे स्वरूप आल्याचे दिसून आले. त्यामुळे स्थानिकांची तारांबळ उडाली.

मळवली भागातील बंगल्यात २० ते २२ पर्यटक अडकले होते. हे सगळे पर्यटक बंगल्यात बसले होते, मात्र बाहेर ढगफुटीसदृश्य पाऊस पडत असल्याची कल्पना यांना नव्हती. बाहेर येऊन पाहिले असता चहुबाजूंनी पाणी दिसून आले. या सर्व पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यात शिवदुर्ग रेस्क्यू टीमला यश आले आहे. **(संबंधित बातमी पान २ वर..)**

## ‘महाराष्ट्रातील १० टक्के मतदार मतदानापासून वंचित’

**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी असल्याने महाराष्ट्रातील सुमारे १० टक्के मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या मतदार याद्यांतील दोष दूर करावे, अशी विनंती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी मतदार याद्यांतील समस्यांसंदर्भात बुधवारी (दि. २४) नवी दिल्लीत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांची भेट घेऊन चर्चा केली आणि निवेदन दिले. याबाबत त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत माहिती दिली.




# प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखान वधाचा प्रसंग

### ■ शिवरायांच्या पराक्रमाची महती सांगणारा पुतळा सरकार उभारणार

**पुणे : प्रतिनिधी**

शिवकालीन इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या अफजलखानाच्या वधाच्या प्रसंगाची आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची महती सांगण्यासाठी राज्य सरकारकडून लवकरच प्रतापगडाच्या पायथ्याशी एक पुतळा उभारला जाणार आहे. शिवरायांनी वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला होता. त्याच प्रसंगाची आठवण करून देणारा पुतळा प्रतापगडाच्या पायथ्याशी उभारला जाणार आहे.



येत्या महिनाभरात या पुतळ्याचे अनावरण केले जाणार आहे. या पुतळ्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून तयार करण्यात येत असलेला हा पुतळा १८ फुटांचा आहे. पुण्यात शिल्पकार दीपक थोपटे पुतळा साकारत आहेत.

किल्ले प्रतापगडावर दरवर्षी शिवप्रताप दिन साजरा केला जातो. या दिनानिमित्त सरकारच्या वतीने प्रतापगडावर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाला कंठस्नान घातले, तो दिवस शिवप्रताप दिन म्हणून साजरा केला जातो. शिवरायांच्या शौर्याच्या अनेक प्रसंगापैकी एक म्हणजे अफझलखानाचा वध आहे. त्यानिमित्त प्रतापगड उत्सव म्हणजेच शिवप्रताप दिन साजरा केला जातो.

# लोणावळ्यात रेकॉर्डब्रेक पाऊस

## नऊ तासांत १४५ मिमी पावसाची नोंद; शाळांना सुट्टी

**पुणे : प्रतिनिधी**

लोणावळ्यात यावर्षीचा रेकॉर्डब्रेक पाऊस कोसळला आहे. गेल्या नऊ तासांत १४५ मिलीमीटर पाऊस कोसळला असून पावसाने जोरदार बॅटिंग केली आहे. या वर्षीचा हा रेकॉर्डब्रेक पाऊस झाला, असल्याने लोणावळ्यातील नदी-नाले ओसंडून वाहू लागले आहेत.



लोणावळ्यात पावसाचा जोर सोमवारपासून कायम आहे. गुरुवारी आणि शुक्रवारीही अधिकचा पाऊस बरसेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे शहरातील बारावीपर्यंतच्या सर्व शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून नगर परिषदेचे मुख्याधिकारी अशोक साबळेंनी सुट्टी देण्याचा निर्णय घेतला आहे.

लोणावळ्यात अवघ्या नऊ तासांत १४५ मिलीमीटर पाऊस बरसला आहे. बुधवारी (दि.२४) सकाळी ८ ते सायंकाळी ५ दरम्यानच्या पावसाची ही नोंद आहे, तर सोमवारी दिवसभरात २७५ मिलीमीटर पाऊस कोसळला होता. याच पार्श्वभूमीवर शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय आतापर्यंत लोणावळ्यात २६०१ मिलीमीटर पाऊस झाला आहे. जो गेल्या वर्षीच्या तुलनेत १०१ मिलीमीटरने जास्त आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेपर्यंत २५०१ मिलीमीटर पाऊस झाला होता.

राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अनेक जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा या भागात १०० मिलीमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे, तर मावळ आणि भीमाशंकर परिसरात २०० मिलीमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे.

कार्ला, मळवली, सदापूर या भागामध्ये इंद्रायणी नदीच्या पात्रातील पाणी आजूबाजूच्या परिसरामध्ये पसरले आहे. देवले ते मळवली या रस्त्यावर जवळपास दीड ते दोन फूट पाणीच असल्याने नागरिकांना या पाण्यामधून वाट काढत प्रवास करावा लागत आहे.

# विकासकामे नियोजित वेळेत मार्गी लावा

## ■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

विकासकामांची गती राखण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. विलंबामुळे प्रकल्पांच्या किंमतीत भरमसाठ वाढ होऊन राज्याचे दीर्घकालीन नुकसान होते, ते टाळण्यासाठी नियोजित वेळेत विकास प्रकल्प मार्गी लावण्यावर भर द्यावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि.२४) दिल्या, तसेच पुणे शहरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर असून सर्व विभागांनी योग्य समन्वय राखत पुणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी दिले.




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका क्रमांक ३च्या कामाला गती द्या, तसेच हडपसर ते लोणीकाळभोर, हडपसर ते सासवड, स्वारगेट ते कात्रज, वनाज ते चांदणी चौक, रामवाडी ते वाघोली या वाढीव मेट्रो मार्गांच्या परवानगीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करा. नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या पुणे शहर आणि उपनगरांची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे रिंग रोडचे काम वेगाने मार्गी लावा. त्याचबरोबर पुणे शहरातील रस्त्यावर पडलेले खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत. त्यांनी या वेळी सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालय, सैनिक स्कूल, अलिबागच्या उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग, पुणे बाह्यवळण रस्ता, वडाळा येथील जीएसटी भवन, पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे, सारथी संस्थेचे पुण्यातील मुख्यालय, औंध, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, अमरावतीतील 'सारथी'च्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, पुणे येथील कृषीभवन, शिक्षण आयुक्तालय, कामगार कल्याण भवन, सहकार भवन, नोंदणीभवन आदी प्रकल्पांच्या प्रगतीचा देखील आढावा घेतला.

# नेरळमध्ये विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील साई मंदिर परिसरात धामोते भागात असलेल्या शेतकऱ्याच्या दुभत्या म्हशीचा मंगळवारी (दि.२३) विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाला. दुभती म्हैस दगवल्याने शेतकऱ्याचे हजारोंचे नुकसान झाले असून महावितरणकडून पंचनामा करण्यात आला आहे.



नेरळ-कळंब रस्त्यावर साई मंदिर येथे सुखदेव यादव यांचा दुग्धव्यवसाय आहे. त्यांच्या तबेल्यात असलेल्या म्हशी दररोज काही वेळासाठी तबेल्यातून बाहेर नेल्या जातात. त्यातील एक दुभती म्हैस ही रस्त्याच्या कडेने जात असताना त्या म्हशीच्या अंगावर जीवंत विजेची तार कोसळली आणि विजेचा धक्का लागल्याने म्हशीचा मृत्यू झाला. मृत म्हैस ही दुभती असल्याने संबंधित शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबत नेरळ मंडळ अधिकारी कार्यालयातील तलाठी यांनी पंचनामा पूर्ण केला असून महावितरण कंपनीनेदेखील या घटनेची नोंद घेतली आहे. महावितरणकडून संबंधित म्हशीच्या मृत्यूप्रकरणी पंचनामा करून शेतकऱ्याला मदत देण्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# करंजाडे, चिंचपाडा रेल्वे फाटकावरील भुयारी मार्ग कामाला लवकरच सुरुवात

**पनवेल : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश येऊन लवकरच तालुक्यातील करंजाडे, चिंचपाडा रेल्वे फाटकावरील अंडरपासच्या सेक्टर २मधील (भुयारी मार्ग) कामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा वेळ वाचून फायदा होणार आहे.



पनवेलमधून जेएनपीटी मार्गावर किंवा कॉलेजमध्ये जाण्यासाठी करंजाडे येथील चिंचपाडा रेल्वे फाटकावर नेहमीच मालगाडी आल्यावर फाटक बंद असल्याने बराच वेळ थांबावे लागते. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. यासाठी रेल्वेतर्फे आदिवासीवाडीजवळ भुयारी मार्गाचे काम करण्यात येत होते. हे काम गेली दोन-तीन वर्षे बंद होते. याबाबत सरपंच मंगेश शेलार यांनी आमदार महेश बालदी यांना त्याबाबत रेल्वे मंत्रालयकडे पाठपुरावा करण्याचे पत्र दिले होते.

आमदार महेश बालदी यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश येऊन रेल्वेचे अधिकारी सरबजीत यांनी बुधवारी (दि.२४) करंजाडे ग्रामपंचायत सरपंच मंगेश शेलार, वडघर पंचायत समिती अध्यक्ष समीर केणी, माजी सरपंच शशिकांत भोईर, उपसरपंच सागर आंग्रे, नाथाभाऊ भरवाड, सुनील भोईर यांच्यासह कामाची पाहणी केली. कामाचे ठेकेदार नाईक यांना काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत की आमचे अशिलांनी मौजे वाजे ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचं ठर्रावले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पां.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| वाजे | अरूण धर्मा मोकल | ६८ | १ | ०-३५-०० | ४.८३ |
| | विकी मोहन मोकल | | | ०-०७-५० | |

**सदर जमिन मिळकतीपैकी ०-२१-०० गुठे जमिन मिळकतीची जाहीर नोटीस**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकुमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ता : पनवेल**
**दिनांक :२४/०७/२०२४**

**सही/-**
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**
आफिस नं. - १३५, पहिला मजला नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल : ९३२४३७५५०२

# रेवदंड्यात वृद्ध महिलेला लुटले; अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आगरआळी येथे राहत असलेल्या ७५ वर्षीय वृद्ध महिलेस मंगळवारी (दि.२३) रात्रीचे सुमारास मागील बाजूने घरात प्रवेश तिला लुटल्याची घटना घडली आहे. रेवदंडा पोलीस ठाणे येथे दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्याच महिन्यात आगरकोट किल्ला परिसरात असाच चोरीचा प्रकार घडला होता. त्यामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रेवदंडा आगरआळी येथे ७५ वर्षीय सुनंदा प्रभाकर राऊत या एकट्याच राहतात. मंगळवारी रात्री ११.३० वा.चे सुमारास दोन अज्ञात चोरट्यांनी घराचे मागील बाजूने प्रवेश करून त्यांचे तोंड दाबून 'आवाज करून नकोस नाहीतर ठार मारेन' असे धमकावून बांधून ठेवले.

त्यानंतर त्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची बोरमाळ तसेच पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कुड्या काढून घेतल्या. देव्हाऱ्यामध्ये ठेवलेले १९०० रूपये असे एकूण ४६ हजार ९०० रूपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला. याबाबत सुनंदा प्रभाकर राउत यांनी नोंदविलेल्या तक्रारीनुसार, रेवदंडा पोलीस ठाणे येथे दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीकांत किरविले करीत आहेत.

# महापारेषणच्या संचालकपदी तृप्ती मुधोळकर यांची नियुक्ती

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) संचालक (वित्त) पदाचा कार्यभार तृप्ती नितीन मुधोळकर यांनी घेतला. संचालक (वित्त) या पदावर विराजमान होणाऱ्या त्या महापारेषणच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी महानिर्मिती कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून मुख्यालय, मुंबई येथे काम पाहिले होते.



चार्टर्ड अकाऊंटंट पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या ऑगस्ट १९९६मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ४०० के. व्ही. विभागीय कार्यालय, नागपूर येथे व्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर महानिर्मितीच्या स्थापत्य विभाग खापरखेडा, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, अंतर्गत लेखा विभाग नागपूर, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, बांधकाम विभाग कोराडी आणि मुख्यालय मुंबई इत्यादी ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर त्यांनी यशस्वीरीत्या काम केले आहे. व्यवस्थापक (वित्त व लेखा) ते मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अशा विविध महत्वपूर्ण पदांवर त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला होता.

महानिर्मितीमध्ये त्यांना स्थापत्य, प्रकल्प, संचलन व सुव्यवस्था, अंतर्गत लेखा परीक्षण, कॉर्पोरेट अकाऊंटसचा मोठा अनुभव आहे, तसेच महापारेषण कंपनीत वित्तीय तज्ज्ञ म्हणून त्या संचालकपदी कार्यरत होत्या.

# पालीतील रिक्षाचालकाची मुलगी झाली सीए

**पाली : प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मेहनत व चिकाटीने पालीतील शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी चैत्राली निगडे सीए झाली आहे. तिचे वडील रिक्षाचालक आहेत. पालीवाला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे मंगळवारी (दि.२३) चैत्रालीचा सन्मान करण्यात आला.

या वेळी चैत्रालीने आपल्या या यशाचा खडतर प्रवास सांगितला, तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे आभार मानले. चैत्राली सीए होण्यासाठी आठ वर्षे मेहनत घेत होती. तिला चार वेळा अपयशही आले, मात्र तिने सर्व अपयशांना पचवत कठोर मेहनत, जिद्द आणि अथक परिश्रमाच्या जोरावर अखेर तिने सीएची परीक्षा पास केली. तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे सचिव रविकांत घोसाळकर, प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग यांच्या हस्ते तिचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या वेळी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. संतोष भोईर, प्रा. कृष्णा जांबेकर, प्रा. डॉ. भारती आरोटे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल झेंडे, ग्रंथालय प्रमुख लिंताज उके, प्रा. जालेंदर कालकुटे, चैत्रालीचे आई व वडील, भाऊ, बहिण उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष भोईर व आभार प्रा. कृष्णा जांबेकर यांनी केले. आमदार भरत गोगावले यांनीसुद्धा चैत्रालीचा सन्मान केला. सुएसोचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, कार्यवाह गीता पालरेचा यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





**चौक : खालापूर तहसील कार्यालयाच्या आवारातील सेतू केंद्राच्या मागील बाजूचे झाड पोलीस ठाण्याच्या छपरावर पडले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने पडलेले झाड बाजूला केले.**

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक १२ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोलादपुर काटेतळी नागाव ते विन्हेरे रस्ता प्रजिमा ६८ किमी ०/० ते ७/५०० वार्षिक देखभाल व दूरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १८९३४०९/- | १९०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| २ | पैठण कोतवाल बु जे दाभाट धनगरवाडी ते परसुले रस्ता प्रजिमा १०८ किमी ०/० ते ७/५०० वार्षिक देखभाल व दूरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १७८१७३०/- | १८०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ३ | देवपुर पैठण ओंबळी ते जिल्हा हद्द प्रजिमा ७२ किमी ०/० ते ११/३०० वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १६७०३६३/- | १७०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ४ | कापडे पितळवाडी अडावळे बोरघर कामथे ते दिंडोशी मार्ग प्रजिमा १०१ किमी ०/० ते २२/०० वार्षिक देखभाल व दूरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १६४४७६२/- | १७०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ५ | बोरज उमरठ चांदके खोपट ढवळे प्रजिमा १०९ किमी ०/० ते ११/६०० वार्षिक देखभाल व दूरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १५८९८३४/- | १६०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ६ | मुरुड तळेखार रोहा कोलाड विळे ताम्हाणीघाट प्ररामा ५ किमी ६३/०० ते ७०/२०० वार्षिक देखभाल व दूरुस्ती करणे ता पोलादपुर जि रायगड | १८२७१९७/- | १९०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२४/०७/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **३१/०७/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **०२/०८/२०२४** वेळ १०.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३३२५**
**दिनांक : २३/०७/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने काम करा

## मंत्री रवींद्र चव्हाण यांचे भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रियतेने काम करून आपला बूथ अधिकाधिक मजबूत करावे, असे आवाहन राज्याचे मंत्री तथा भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा पदधिकाऱ्यांच्या बैठकीत केले. पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्ह्याची बैठक मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर अणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. २४) झाली.



या बैठकीत मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष हाच सर्वांत मोठा पक्ष ठरेल. तसेच पुढचा मुख्यमंत्री महायुतीचाच असेल. यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे. घराघरात जाऊन महायुती सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहचवाव्यात, असे आवाहन केले तसेच लोकसभा आणि पदवीधर निवडणुकीत भाजपला मिळेलेल्या यशाबद्दल कार्यकर्त्यांचे कौतुक केले करत अगामी विधनासभा निवडणुकीत ही अश्याच पद्धतीने काम करावे, असे सांगितले.

बैठकीवेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, उरणच्या माजी नगरअध्यक्षा सायली म्हात्रे, माजी नगरसेविका निता माळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.




**भाजप जिल्हा चिटणीस (कार्यालयीन मंत्री)पदी नियुक्ती झाल्याचे पत्र अमरीश मोकल यांना मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते या वेळी देण्यात आले.**

# दुबईतून गुंतवणुकीचे आमिष देणाऱ्या टोळीतील एक आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

दुबई येथुन फिर्यादीला फोरेक्स ट्रेडींगमध्ये गुंतवणुक करून चांगला परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादीस त्यांचे डेबिट, केडिट कार्डमधुन टप्याटप्याने एकूण १८,५४,२५५ रुपये वेगवेगळ्या खात्यावर ट्रान्सफर करावयास सांगुन व चार लाख रुपये रोख घेऊन एकूण २२,५४,२५५ रुपयांची फसवणुक केली म्हणुन खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला.



सायबर सेल, पनवेलच्या पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व पथकाने गुन्ह्यातील बँक व्यवहार विश्लेषण आणि क्लिष्ट तांत्रिक विश्लेषण केले असता गुन्ह्यातील संशयित आरोपी टोळी ही दुबई येथुन फॉरेक्स ट्रेडिंग फॉड करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्हयातील एक आरोपी अॅन्टॉप हिल मुंबई याठिकाणी आला असल्याची माहिती मिळाली असता अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीकडे गुन्हयातील नमुद कंपनी, वेबसाईट व इतर आरोपी इ.बाबत अधिक माहिती व पुरावे मिळुन आले असुन सायबर सेल, पनवेल त्याअनुषंगाने पुढील तपास करीत आहेत.

फिर्यादीच्या फसवणुक झालेल्या एकूण २२,५४,२५५ रुपयांपैकी एकुण ९,७५,४५५ रुपये रक्कम फिर्यादीस बँकांकडुन परत करण्यात येत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास ईएमसी सायबर सेल, पनवेल पोलीस निरिक्षक दिपाली पाटील करीत आहेत. नवी मुंबई आयुक्तालयामार्फत जनतेला आवाहन करण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २४/०४/२०२४ रोजी एकुण ७५ फॉरेक्स डिलर्स अनधिकृत घोषित केलेले असुन आरबीआयने फॉरेक्स ट्रेडींगबाबत वेळोवेळी नियम, सुचनाही जारी केलेल्या आहेत.

फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणुक करण्यापुर्वी माहिती घेवुन सतर्क राहुन गुंतवणुक करावी. ऑनलाईन फसवणुकीची तकार टोल फ्री क्र.१९३० किंवा byberbrime.gov.in येथे करावी.



**पनवेल :** मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे आणि तो प्रत्येकाला बजावता यावा यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात तीन दिवसीय मतदान नाव नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला मंगळवारपासून सुरुवात झाली. या वेळी भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, चिटणीस वरूण डांगर, सर्वज्ञ ठाकूर, प्रभाग १५चे अध्यक्ष रोहित कोळी, प्रभाग १७ अध्यक्ष श्रवण घोसाळकर, युवा मोर्चा शहर सदस्य सिद्धेश खानावकर, कोमल कोळी आदी उपस्थित होते.

# आमदार निरंजन डावखरे यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघात भाजप महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा मोठा विजय मिळवत हॅट्रिक केली. त्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या वतीने निरंजन डावखरे यांचा आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी बुधवारी (दि. २४) पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या निडवणुकीच्या सुरुवातीलाच आमदार डावखरे यांनी प्रचारात आघाडी घेतली होती तसेच त्यांना विविध संस्था, संघटनांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. या निवडणुकीत आमदार निरंजन डावखरे यांनी पहिल्या पसंतीची एक लाख ७१९ मते मिळवून विजयी झाले. त्याबद्दल त्यांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यनुसार पनवेल मधील शासकीय विश्रामगृहात आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अनिवाश कोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन निरंजन डावखरे यांचा सत्कार केला.



या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, उत्तर रायगड किसान मोर्चा अध्यक्ष अतुल बडगुजर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, उपाध्यक्ष अमित ओझे, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, युव ामोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी, युवा नेते हॅप्पी सिंग, केदार भगत, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव आदी उपस्थित होते.

## अपघातात एक ठार; पाच जण जखमी

**पनवेल :** भरधाव वेगाने एर्टीगा गाडी घेऊन पनवेल बाजूकडे येत असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटून गाडी रस्त्याच्या खाली ती पलटी झाल्याने झालेल्या अपघातात गाडी चालकाचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे. तर गाडीतील इतर पाच जण जखमी झाले आहेत. पुणे बाजूकडून पनवेल बाजूकडे एर्टीगा गाडी घेवून अजय गिरे (वय २१) व त्याचे सहकारी पहाटेच्या वेळी येत असताना जुना पुणे–मुंबई महामार्गावर बारवई गावाच्या हद्दीत त्याचा गाडीवरील ताबा सुटून गाडी रस्त्याच्या खाली उलटून झालेल्या अपघातात अजय गिरे याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर इतर सहकारी जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**नवी मुंबई :** भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. लोकमान्य टिळकांनी पुणे येथे न्यु इंग्लिश हायस्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज सुरू केले. लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण व्हावी या हेतूने 'सार्वजनिक गणेशोत्सव' आणि 'शिवजयंती' उत्सवाला सुरुवात केली. जनजागृतीस्तव 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्रे सुरू केली. टिळकांनी १९१६ मध्ये डॉ. नी बेझंट यांच्या सहकार्याने होमरुल लीग संघटनेची स्थापना केली.

# भारत नामांकन संस्थेतर्फे गव्हाण विद्यालयात प्रश्नमंजुषा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत मानक संस्था अर्थात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (बी.आय.एस.)च्या मुंबई शाखेच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची प्रश्नमंजुषा स्पर्धा सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आली. बी.आय.एस.च्या तज्ज्ञ मार्गदर्शिका सुनिता नागरे व तज्ज्ञ मार्गदर्शक सूरज विश्वकर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धेचे संयोजन केले.



भारत मानक बेरोजच्या विद्यालयातील स्थापन करण्यात आलेल्या क्लबच्या संचालिका योगिता पाटील यांनी या परीक्षेचे स्पर्धा परीक्षेचे नियोजन केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसिद्ध विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले तसेच बी.आय.एस.च्या विद्यालयाच्या प्रमुख योगिता पाटील,विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आणि स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख रकमेची पारितोषिके देण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धेच्या संयोजिका बी.एस.आय.च्या तज्ज्ञ मार्गदर्शिका सुनीता नागरे यांनी सांगितले.

# बालग्राम अनाथाश्रमास अन्नदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी विशेष सहाय्यक, गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे यांनी बालग्राम अनाथ आश्रमास अन्नदान करून आपला वाढदिवस उत्साहात साजरा केला.

या वेळी बालग्राम, पनवेलचे अधीक्षक डॉ. विनायक पाटील, शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेलच्या प्रो.डॉ. नीलिमा अरविंद मोरे, प्रा. बिजली दडपे, प्रा. प्रज्ञा लातूरकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे सहकारी मीनाक्षी अविनाश भाकरे, कमलेश सराफ, अभिषेक परब, स्वाती अभिषेक परब, माजी शाखा प्रबंधक, प्रतिमा जाधव, विशेष तंत्रज्ञानी अविनाश भाकरे, दिलीप संपतराव मोरे आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. विनायक पाटील म्हणाले की, अरविंद मोरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बालग्राम महाराष्ट्र, पनवेल येथील गरजू मुलांना भोजन देऊन त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला. त्याबद्दल आम्ही त्यांचे कौतुक करतो. त्यांच्या ह्या कृतीमुळे इतरांनासुद्धा प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

उपस्थितांनी अरविंद मोरे यांना वाढदिवसासारख्या शुभेच्छा देऊन आगळ्या वेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याबद्दल प्रशंसा केली.



# सुधीर घरत यांनी विद्यार्थ्यांची शालेय फी भरून जपली सामाजिक बांधिलकी

**उरण : बातमीदार**

सुधीर घरत सामाजिक संस्थेतर्फे आजपर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. आजपर्यंत संस्थेच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना मोठ्या प्रमाणात मदतदेखील करण्यात आली. सुधीर घरत सामाजिक संस्थेचे संस्थापक तथा कामगार नेते सुधीर घरत यांनी सामाजिक बांधिलकी जपत उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या द्रोणागिरी हायस्कूल करंजा शाखेतील गोर गरीब, होतकरू, गरजू ३० विद्यार्थ्यांची एकूण शैक्षणिक ३४, ५०० (चौतीस हजार पाचशे) भरून विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून त्यांच्या शिक्षणासाठी मदत केली आहे.



सुधीर घरत हे कामगार क्षेत्रात कार्यरत असून ते रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य तसेच माजी विद्यार्थी संघटना फुंडे कॉलेजचे ते अध्यक्षसुद्धा आहेत. त्यांच्या या आदर्श व प्रेरणादायी कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आर्थिक मदत सुधीर घरत सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश पाटील, कार्याध्यक्ष जयप्रकाश भोईर, सेक्रेटरी संकेत कडू, वैष्णवी सुधीर घरत यांनी द्रोणागिरी हायस्कूल करंजाचे प्राचार्य सुरेखा म्हात्रे यांच्याकडे सुपूर्त केले.

गोरगरीब होतकरू, गरजू विद्यार्थीचे फी सुधीर घरत यांनी भरल्याने गोर गरीब, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना पुढील चांगले शिक्षण मिळणार आहे. त्यामुळे द्रोणागिरी हायस्कूल करंजाचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी यांनी कामगार नेते तथा सामाजिक कार्यकर्ते सुधीर घरत व त्यांच्या सुधीर घरत सामाजिक संस्थेचे, पदाधिकाऱ्यांचे जाहीर आभार मानले आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात समुपदेशन कक्षामार्फत कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त), महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी, इन्स्टिट्यूट ऑफ सायकोलॉजिकल हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने स्टाईल मैं जिना सिखो जी या विषयावर महाविद्यालयाच्या समुपदेशन कक्षामार्फत एक दिवसीय कार्यशाळेचे सोमवारी (दि. २२) महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ व आयपीएचचे संस्थापक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक विभागाद्वारे सादर केलेल्या स्वागतगीताने झाली, तदनंतर औपचारिक स्वागताच्या कार्यक्रमानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आणि भावनिक विकास महत्त्वाचा असल्याचा संदेश दिला. प्रास्ताविक समुपदेशन कक्षाच्या प्राधिकृत अधिकारी स्वाती परब यांनी प्रज्ञा परिसर प्रकल्प आणि युवा मानसरंग या दोन्ही समूहाच्या माध्यमातून महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा दिला व कार्यशाळेचे मुख्य वक्ते व मार्गदर्शक डॉ. आनंद नाडकर्णी यांचा परिचय दिला.

डॉ. आनंद नाडकर्णी यांनी भाव–भावनांच्या नियोजनाबाबत माहिती देताना मी, आम्ही आणि आपण या तीन तत्वांचा उल्लेख करत प्रत्येकाने 'मी' या तत्वापासून 'आपण' या तत्वापर्यंतचा प्रवास साध्य करण्याचा मार्ग सांगितला. यासोबतच बदलती जीवनशैली, जीवन जगत असताना आपल्या ध्येयाप्रत पोहचताना मार्गात येणारी आव्हाने याबाबत अचूक मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रज्ञा प्रकल्प परिसर आणि युवा मानसरंग या दोन्ही एकाकांच्या माध्यमातून इमोशन फ्रेंडली कॅम्पस करण्याच्या दृष्टीने आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशस्वी संचालनाबाबत महाविद्यालयाचे कौतुक केले.

व्यासपीठावर एम.एस.एफ.डी.ए. चे मा. मिथिलेश भाकरे, इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, मानव्यविद्याशाखा शाखाधिपती प्रो. डॉ. बी. एस. पाटील, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. गणेश साठे, लेखा व वित्त विभागाचे प्रा. मनोज सुपेकर उपस्थित होते. याबरोबर प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रज्ञा परिसर प्रकल्पची सदस्य जान्हवी हातमोडे व आदिती कसारे यांनी केले व आभार प्रदर्शन मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी केले.

यशस्वी आयोजनासाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली समुपदेशक कक्षाचे सर्व सदस्य, प्राध्यापकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.



## संपादकीय

# अमेरिकी निवडणुकीत रंगत

ज्यो बायडन यांना अखेर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील उमेदवारीतून माघार घेणे भाग पडले. त्यांच्यानंतर आता रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर विद्यमान उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांचे नाव पुढे आल्यामुळे अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील रंगत वाढली आहे.

**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीला जेमतेम चार महिने उरलेले असताना राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन यांना अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी सुरू असलेल्या स्पर्धेतून अखेर माघार घ्यावी लागली. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार, माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर काही दिवसांपूर्वीच जीवघेणा हल्ला झाला होता. त्यानंतर अमेरिकी नागरिकांचा कल त्यांच्या बाजूला अधिकच झुकू लागल्याचे चित्र निर्माण झाले. हल्ल्याच्या या घटनेच्या आधीपासूनच बायडन यांच्यावर पक्षातून आणि पक्षाबाहेरूनही सतत उमेदवारी सोडण्याकरिता दबाव येत होता. अनेक कार्यक्रमांत व सभांमध्ये बोलताना व चालताना अडखळल्याने वा गोंधळल्याने पुन्हा पुन्हा त्यांच्या वयाचा मुद्दा उकरून काढला जात होता. अखेरीस त्यांनी पुन्हा निवडणूक लढवण्याचा आपला हट्ट सोडला असला तरी अकस्मात घेतलेला हा निर्णय त्यांनी स्वखुशीने घेतला की त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला याचीही चर्चा झालीच. हाच निर्णय बायडन यांनी योग्य वेळेत घेतला असता तर अधिक योग्य ठरले असते. पण वय झाले तरी सत्तेच्या आणि प्रतिष्ठेच्या पदाचा मोह भल्याभल्यांना सुटत नाही हे अनेक उदाहरणांत दिसले आहे. मुळात ट्रम्प यांच्या विरोधात लढण्यासाठी पहिल्यांदा ७७ वर्षांच्या बायडन यांना उतरवण्यात आले तेव्हाही त्यांच्या वयाच्या अनुषंगाने, आरोग्याविषयी शंका उपस्थित करण्यात आल्याच होत्या. परंतु डेमोक्रॅटिक पक्षात सर्वांची सहमती लाभेल असा दुसरा नेताच समोर नसल्यामुळे त्यावेळी बायडन यांची निवड झाली होती. अर्थात, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणूनही त्यांनी काही विशेष ठसा उमटवलेला नाहीच. रशिया-युक्रेन युद्ध असो की इस्रायल-हमास युद्ध दोन्ही संदर्भात ते कुठलाही तोडगा काढू शकले नाहीत. देशांतर्गत प्रश्नांनाही त्यांनी कसेबसेच तोंड दिले असेच म्हणावे लागेल. त्यांच्या कारकीर्दीदरम्यान चीनसोबतच्या अमेरिकेच्या बिघडलेल्या संबंधांमध्ये कुठल्याही अर्थाने सुधारणा दिसून आली नाही. इतकेच कशाला, अलिकडे ट्रम्प यांच्यासोबतच्या खुल्या चर्चेत बायडन ट्रम्प यांच्यासमोर जराही छाप पाडू शकले नाहीत. उलट चर्चेदरम्यान त्यांना काही काळ विस्मरण झाल्याचेच अधिक बोलले गेले. ट्रम्प यांच्यासमोर ते अगदीच निष्प्रभ ठरत गेल्यानेच पक्षातून त्यांच्यावर माघार घेण्यासाठी दबाव वाढू लागला. यात माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्यासह त्यांच्या पक्षातील इतर ज्येष्ठ होते तसेच अनेक सिनेटसदस्यही होते. अखेर त्यांनी कोविड झाल्याचे जाहीर केले. विलगीकरणात गेल्यावर तीन दिवसांनी त्यांनी अध्यक्षीय निवडणूक लढवणार नसल्याचे तसेच कमला हॅरिस यांना पाठिंबा देत असल्याचे आपल्या 'एक्स' अकाऊंटवरून जाहीर केले. कमला हॅरिस यांच्या आई भारतीय वंशाच्या असल्यामुळे भारतीयांचा अमेरिकी निवडणुकीतील रस आता नक्कीच वाढणार आहे. हॅरिस या पहिल्या कृष्णवर्णीय महिला उमेदवार असून त्या विजयी झाल्या तर अमेरिकेच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरतील. आपल्या पहिल्यावहिल्या सभेतच त्यांनी ट्रम्प यांच्याविरोधात आक्रमक हल्ला चढवल्याचेही आता समोर आले आहे. कृष्णवर्णीय वडील, भारतीय वंशाची आई, स्वत: एक करारी वकील असणे तसेच ट्रम्प यांच्यापेक्षा वीस वर्षांनी तरुण असणे या हॅरिस यांच्या जमेच्या बाजू आहेत.**

# माणगावने वृक्षारोपणात गाठला उच्चांक

## एक लाखाचा आकडा पार, दरडग्रस्त गावात बांबू लागवडीचे विणणार जाळे

**माणगाव : प्रतिनिधी**

वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी शासन कठोर पावले उचलत आहे. रायगड जिल्ह्याला निसर्गाने भरभरून दिले आहे, मात्र वाढत्या वणव्यामुळे इथली झाडेझुडपे नष्ट होत आहेत. त्याचा परिणाम जंगलातील पशू, पक्षी, प्राण्यांवर होत आहे. दरवर्षी शासन पावसाळ्यात वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करते. त्यापैकी काही झाडे जगतात, तर काही मरतात. माणगाव तालुक्यात मात्र यंदाचे वर्षी एक लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली आहे, तर सहा दरडग्रस्त गावात बांबू लागवड करून डोंगर व जमिनीची होणारी धूप थांबविण्यासाठी बांबूच्या बेटांचे जाळे विणण्यात येणार आहे.



पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार, प्रभारी कृषी अधिकारी अशोक मारकड, कृषी विस्तार अधिकारी शिवदत्त परजणे, वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिरूद्ध ढगे यांच्या नियोजनाने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. पंचायत समितीने यंदाचे वर्षी ६० हजार झाडांची रोपे उपलब्ध करून दिली आहेत.

एका ग्रामपंचायतीला ७९० रोपे लागवडीचे उद्दिष्ट दिले होते. तालुक्यात ७४ ग्रामपंचायती व एक नगरपंचायत आहे. त्या दृष्टीने नियोजन करून वृक्ष लागवड करण्यात आली. ही रोपे पहेल येथील सामाजिक वनीकरण रोपवाटिकेतून आणून त्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. यात जंगली, सावली, फळ, कारंज, सीताफळ, कांचन, गुलमोहर, आंबा, काजू अशी विविध रोपांची लागवड केली आहे.

तालुक्यातील पहेल, गारळ, आडघर, रेपोली, न्हावे, टोळखुर्द ही सहा गावे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांनी संभाव्य दरडग्रस्त म्हणून जाहीर केली आहेत. या गावात भोर, पुणे येथील नर्सरीतून सुधारित बांबूची जात थाई तुल्डा, इंडियन तुल्डा या दोन्ही जातीची रोपे आणून त्याची लागवड केली जाणार आहे.

वनविभागाने यंदा ४५ हजार विविध झाडांची लागवड शासनाच्या वनविभाग व मुंबई-गोवा महामार्गालगतच्या जागेत केली आहे. यामध्ये वड, करंज, तामण, पिंपळ, चीवन, आवळा, पळस, बांबू, जांभूळ, फणस, आंबा यासारखी विविध फळ व सावली देणारी वृक्षाची लागवड केली आहे. या लागवड केलेल्या वृक्षांना काटेरी कुंपण केली आहे. त्यामुळे आगामी काळात ही वृक्ष अधिक बळकट होणार आहेत.

# मुरूड-रोहा मार्गावर झाड पडल्याने वाहतूक ठप्प

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड-रोहा गार्गावर जुने वडाचे मोठे झाड बुधवारी (दि.२४) सकाळी पडल्याने वाहतूक खोळंबली होती. याबाबत माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम खात्याने हे झाड हटवून वाहतूक सुरळीत केली.

मुरूडनजीक आंबोली गावानजीक हे झाड रस्त्याच्या मधोमध पडल्याने वाहतूक खोळंबली होती. एसटी वाहतूक राजपुरीमार्गे वळविण्यात आली. रोहा येथे जाण्यासाठी सर्व वाहतूक राजपुरीमार्गे सोडण्यात येत होती. वडाचे झाड रस्त्यावरून हटविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने दोन जेसीबी व तीन कटर मशीन आणण्यात आल्या होत्या. यासाठी किमान पाच ते सहा तास लागले व रस्ता मोकळा झाला.



(छाया : सुधीर नाझरे)

# रोहेकरांना उड्डाणपुलाची प्रतीक्षा

## रेल्वे फाटक ठरतेय डोकेदुखी

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील अष्टमी येथील मध्य रेल्वेचे फाटक सातत्याने बंद होत असल्याने फाटक उघडेपर्यंत नागरिकांना ताटकळत थांबावे लागत आहे. या रेल्वे फाटकाला पर्यायी उड्डाणपूल मंजूर असून गेले वर्षभर याचे काम चालू आहे. त्यामुळे उड्डाणपूल कधी पूर्ण होणार याची वाट नागरिक पाहत आहेत.

तालुक्यातील अष्टमी येथे मध्य रेल्वेचे फाटक आहे. कोकणाकडे जाणाऱ्या व मुंबईकडे येणाऱ्या गाड्या वाढल्या आहेत. किमान १० ते ३० मिनटे फाटक बंद असल्याने नागरिकांना ताटकळात थांबावे लागत आहे. रुग्णवाहिका, शाळेत जाणारे विद्यार्थी व धाटाव औद्योगिक क्षेत्रात कामगार यांना सातत्याने त्याचा फटका बसत आहे.



ही समस्या लक्षात घेत खासदार सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने पडम व अष्टमी येथील रेल्वे फाटकाला पर्यायी व्यवस्था म्हणून दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल मंजूर करण्यात आला. अष्टमी येथील रेल्वे फाटकाच्या पर्यायी व्यवस्था असलेल्या उड्डाणपुलाचे काम सुरू होऊन जवळपास दीड वर्ष झाले, परंतु अद्याप उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले नाही.

त्यामुळे नागरिकांना फाटक उघडेपर्यंत किमान १० ते ३० मिनिटे ताटकळत बसावे लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर उड्डाणपुलाचे काम पूर्ण व्हावे, अशी मागणी होत आहे.

# मुरूडमधील प्रत्येक ग्रामपंचायत होणार क्षयरोगमुक्त ; टीबी फोरम बैठकीत निर्धार



**मुरूड : प्रतिनिधी**


क्षयरोग निर्मूलनासाठी जास्तीत जास्त प्रभावीपणे काम करून प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोगमुक्त करण्याचा निर्धार टीबी फोरम बैठकीत करण्यात आला.

या वेळी पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, तालुका आरोग्य अधिकारी संतोष नारायणकर, वैद्यकीय अधीक्षक उषा चोले, आरोग्यसेवक राजेंद्र चुनेकर, माजी वैद्यकीय अधिकारी डॉ. मकबुल कोकाटे, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. अमित बेनकर, डॉ. श्रेया पाटील, डॉ. फैजान मिस्त्री, प्राची चौलकर, आरोग्य विस्तार अधिकारी राजेश वाडेकर, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक विजय वाघमारे, शुभांगी कोतवाल आदींसह आशासेविका, कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून यासाठी तालुका व गावपातळीवर काम केले जाणार आहे. याबाबत कार्यक्रमाची रुपरेषा ग्रामपंचायत स्तरावर केली जाणार आहे. क्षयरुग्णांची तपासणी, उपचार, रोगप्रसार कसा थांबवावा त्याकरिता तालुका टिबी फोरमप्रमाणेच प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत टिबी फोरमची स्थापना केली जाणार आहे. प्रत्येकाने ग्रामपंचायत स्तरावर क्षयरोग निर्मूलनाबाबत जनजागृती करावी, असे गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी आवाहन केले.

तालुक्यात ४२ टिबीचे रुग्ण होते. त्यापैकी चार रुग्णांनी क्षयरोगावर मात करून पूर्णतः बरे झाले आहेत. सध्या ३८ क्षयरुग्णांवर उपचार सुरू आहेत. क्षयरोग नियंत्रणात ठेवण्याकडे आरोग्य विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य अधिक्षक उषा चोले यांनी दिली.

# नेरळ शाळेच्या विद्यार्थ्यांकडून सीडबॉल तयार करून वृक्षारोपण



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ विद्यामंदिरच्या वतीने फणसवाडी येथे सीडबॉल तयार करून वृक्षारोपण कार्यक्रम झाला. या अभिनव उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या वतीने उन्हाळ्याच्या सुट्टीत गोळा केलेल्या विविध प्रकारच्या फळांच्या बीजांचे रोपण व नवीन रोपांची लागवड फणसवाडी येथील डोंगर परिसरात करण्यात आली.

विद्यामंदिर मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीप गडकरी यांनी पर्यावरणसंवर्धन विषयक मार्गदर्शन करताना सीडबॉलची अभिनव कल्पना शिक्षकांसमोर मांडली होती. प्राचार्य प्रमोद विचवे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना आवाहन केले व या सीडबॉल उपक्रमाचे नियोजन केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीत बिया गोळा करून सीडबॉल तयार करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या.

नेरळ शहरापासून तीन किमी अंतरावर असलेल्या फणसवाडी येथील डोंगरात जाऊन विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सीडबॉल रोपण केले, तसेच आंबा, जांभूळ, नारळ, चिंच, पेरू अशी विविध रोपे लावली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. या वेळी शाळेच्या सांस्कृतिक समिती प्रमुख लाड मॅडम, क्रीडा शिक्षक जे. के. पारधी, पी. पी. विशे, एस. एल. सुतार, वाय. व्ही. गेंगजे, कृष्णा हाबळे, एन. एल. वडणे, ए. एम. वसावे आदी शिक्षक उपस्थित होते.

# 'आरसीएफ'मधील भरतीसाठीच्या ऑनलाइन परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलाइजर्समधील (आरसीएफ) कर्मचारी भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेसंबंधी पात्र उमेदवारांना भरतीपूर्व जागरूकता कार्यक्रम शुक्रवारी (दि. २६) आरसीएफ सभागृह, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सशेजारी, सरखेल कान्होजी आंग्रेनगर, कुरुळ येथे आयोजित करण्यात आले आहे.

भरतीसंबंधीत मार्गदर्शन सत्राचे वेळापत्रक उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. संबंधित उमेदवारांनी ई-मेलची प्रत, आधार कार्ड (प्राधान्याने), पॅन कार्ड, ड्रायविंग लायसन्सची छायाप्रत सोबत घेऊन उपस्थित रहावे आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील यांनी केले आहे.

# शासकीय तंत्रनिकेतन आणि कोनायसन्स स्कूलमध्ये वृक्षारोपण



**पेण : प्रतिनिधी**

जागतिक तापमान वाढत असून भारताचे तापमानही संयमित राहावे यासाठी सर्वांना वृक्षारोपण हे कर्तव्य म्हणून करावेच लागेल. यासाठी बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने शासकीय तंत्रनिकेतन पेणच्या आवारामध्ये १५००हून अधिक तर कोनायसन्स स्कूल आवारात २०० वृक्षांचे रोपण करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

